# “घे उंच भरारी”

(भाग-3)

भावना गोखले

*नुकताच जागतिक महिला दिन विविध स्तरांवर सर्वत्र साजरा करण्यात आला. भारत सरकारच्या महिला आणि बाल विकास मंत्रालयाच्या वतीने दरवर्षी प्रातिनिधिक क्षेत्रात उल्लेखनीय काम करून देशाच्या प्रगतीत योगदान देणाऱ्या, बहू कल्पकता असणाऱ्या महिलांचा सत्कार करण्यात येतो. या वर्षी देशभरातून ३१ महिलांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात येऊन त्यांना ८ मार्चला म्हणजे जागतिक महिला दिनी गौरविण्यात आले. आज पासून प्रत्येक महिन्यात दोन अशा ३१ जणींच्या कामगिरीची ओळख "घे भरारी' या मालिके मधून करून देणार आहोत. "घे उंच भरारी" ची ही तिसरी सशक्त नारी जिने" बी बोल्ड फॉर चेंज" ही यावर्षीची संकल्पना सर्वार्थाने खरी केली.*

*आपले अभिप्राय आम्हाला pibmarathi@gmail.com आणि pibmumbai@gmail.com या मेल वर अवश्य कळवा.*





**२० व्या वर्षी लोकोमोटिव्हीची जबाबदारी सांभाळणारी मुमताज काझी**

राष्ट्रपती भवन सभागृह भारताच्या राष्ट्रपतींना शोभेल अशा रीतीने सजविले होते. उंच दालनाला शोभेसे व्हेलवेटचे गालिचे, मोठमोठ्या पूर्व राष्ट्रपतींच्या तसबिरी त्यांचा कार्यकाळ आणि त्यांनी केलेले कार्य याची माहिती सांगत होत्या, फुलांची आरास आणि ऐरफ्रेशनेरचा मंद सुगंध यांमुळे विशेष वातावरण निर्मिती झाली होती. खंर म्हटले तर सर्व वातावरणच आनंदी, उत्साही आणि चैतन्य निर्माण करणारे असे होते. आमंत्रितांनी त्यांची ठरवून दिलेली जागा व्यापायला सुरवात केली होती मुमताज काझी सुद्धा त्यातील एक होत्या. भारत सरकारच्या खास पाहुण्या.

सर्व विशेष आमंत्रित आज भारताच्या राष्ट्रपतींच्या हस्ते सर्वोच सन्मानित नारी शक्ती पुरस्कार घेण्यासाठी आल्या होत्या. आज त्यांच्या अव्यहातपणे निरंतर केलेल्या कार्याला सन्मानित केले जाणार होते. उद्यापासून बहुदा त्या कोणाच्या तरी आइडिअल पर्सनॅलिटी म्हणून ओळखल्या जातील. एकंदरच आनंदी, उत्साही वातावरणाचा प्रभाव मुमताझ यांच्याही मनावर होत होता. त्यांना त्यांच्या भूतकाळातील व्यवसायासाठी घेतलेले परिश्रम, जिद्दीने एक एक पाऊल पुढे जाण्याचा प्रवास आठवू लागला.

घरच्यांचा विरोध असतांना सुद्धा त्यांनी धाडसी निर्णय घेऊन त्यांच्या करिअरला सुरवात केली होती. त्यांचा निर्णय म्हणजे एक प्रकारच्या वादळाची सुरवात होती कारण अवघ्या २० वर्षाची असतांना तिने मोटोरमनची परीक्षा उत्तीर्ण केली, जेव्हा ती एस. एन. डी. टी. विद्यापीठ मुंबई येथून वैद्यकीय प्रयोगशाळा तंत्रज्ञानाचा डिप्लोमा करीत होती. गुजरात मधील बलसार जिल्ह्यातील गंणबीर या छोट्या

तालुक्यात मध्यम वर्गीय कुटुंबात  जन्मलेल्या मुमताजचे सर्व शिक्षण मुंबई येथे झाले. तिचे वडील चर्चगेट रेल्वेमध्ये ट्रॅक सुपरिटेंडंट होते व मुंबईच्या कुर्ला भागातील सरकारी वसाहतीत राहत होते.



रेल्वेच्या चाकांचा रिदम, गाडीचा वेग तिला नेहमीच बालपणी आकर्षित करायचे तिचे संपूर्ण बालपण प्रत्येक ४-५ मिनिटांनी धावणाऱ्या गाड्यांचे निरीक्षण करण्यात गेले. गाडीचा वेग, लांबच लांब ट्रेन ड्राइव्हरकडून ठेवण्यात येणारे गाडीवरचे नियंत्रण याचे निरीक्षण करता करताच ती मोठी झाली. अनुभवाची जोड दिली ती तिच्या वडिलांकडे येणाऱ्या मोटोरमन मित्रांनी जे गप्पा मारायला म्हणून त्यांच्या घरी एकत्र जमायचे आणि आपले अनुभव सांगायचे तिचे वडीलही आपल्यासमोरील आव्हाने आणि अनुभव सांगायचे. ती कधी दरवाजा आडून तर कधी गप्पांमध्ये सहभागी होऊन ऐकायची. हे तिलाही कळले नाही की हा वेडेपणा छंदा मध्ये केव्हा परावर्तित झाला. तिचे तिच्याशी आणि  इतरांशी भांडण असे चालू झाले पण तिने कधीही आपले उद्दिष्ट कोणाजवळ बोलून दाखविले नाही. सर्वसाधारण मध्यमवर्गीय कुटुंबाचे ध्येय असते की, आपल्या मुलांना योग्य शिक्षण देऊन आर्थिकदृष्ट्या सक्षम, स्वावलंबी आणि कुटुंबाच्या जबाबदाऱ्या पाळण्याचे सामर्थ्य निर्माण करणे व जीवन सुखाने जगणे.

‘मोटरमन’ या रेल्वेच्या पद आणि परीक्षेबद्दल विचारले असता मुमताझ म्हणाल्या की, मी जेव्हा रेल्वे  रीक्रुटमेन्टची जाहिरात वाचली तेंव्हा मनाशी ठरवले की यासाठी अर्ज करायचाचे पण जाहिरातीत 'केवळ पुरुषांसाठी' लिहिले होते, हे मी आव्हान समजले आणि १९८८ मध्ये अर्ज केला. १९८९ मध्ये परीक्षेला बसले, मुलाखत दिली वैद्यकीय परीक्षेत सुद्धा उत्कृष्ठ गुण मिळवून पास झाले.

नवीन आवाहनात्मक प्रशिक्षण आणि पोस्टिंग बद्दल विचारले असता त्या म्हणाल्या प्रशिक्षण कालावधीमध्ये ५० पुरुषांमध्ये त्या एकमेव स्त्री होत्या.

"माझे तेंव्हाचे प्रशिक्षक श्री भूपेंद्र सिंग यांना माझ्या अब्बानी त्यांना वाटणाऱ्या काळजी बद्दल विचारले असता त्यांनी, “मुमताज मला माझ्या मुलीसारखी आहे तुम्ही काळजी करू नका, मी तिची काळजी घेईन” असे सांगितले, थोड्या दिवसांसाठी का होईना अब्बाची काळजी कमी झाली असे त्या म्हणाल्या. मुमताज यांनी आपल्या नवीन नोकरीतील आव्हाने व्यक्त करतांना सांगितले की, त्यांनी सप्टेंबर १९९१ला साहाय्यक वाहन चालक या पदाने करियरला सुरवात केली. मी जगातील पहिली लोकोमोटिव्ह चालवणारी होते ज्यामुळे माझ्या कामाची नोंद लिंका वर्ल्ड बुक मध्ये झाली. त्या पुढे म्हणाल्या की माझ्या १३ वर्षाच्या कॅरिअरमध्ये मी शंटिंग, कपलिंग अशी जड कामे केलीत जी आत्ता पर्यंत केवळ पुरुषांनीच केली होती. मी माझ्या स्त्री होण्याची कुठलीही सहानुभूती घेतली नाही मी पुरुष कर्मचाऱ्यांसारखी त्यांच्या खांद्याला खांदा लावून काम करत होते. रेल्वेच्या तंत्रज्ञान माहितीच्या व्यतिरिक्त, तुम्हाला गाडीचे जजमेण्ट ठेवता आले पाहिजे त्यासाठी एकाग्रता आवश्यक आहे. लोकोमोटिव्हच्या चालकाजवळ शारीरिक क्षमताही खूप असायला हवी. तसेच त्वरित निर्णय क्षमता असणेही आवश्यक.

जर तुम्ही कार शेड पासून ड्रायविंग करीत असाल तर तुम्हाला चढून ड्रायव्हरच्या दरवाजा पर्यंत जाता आले पाहिजे. काही गाड्यांचे ब्रेक जवळपास २० वेळा गाडी वेगळ्या दिशेनी वळवितांना फिरवावे लागतात, यासाठी बरीच एनर्जी खर्च करावी लागते. जी सर्व महिलांजवळ नसते. परंतु गेली कित्येक वर्ष मुमताज हे काम बिनधास्त करायची. तिच्या या कार्यक्षमतेसाठी तिला वर्ष २००५ पासून उपनगरीय रेल्वेचे काम सोपविण्यात आले.

**तुम्ही कोणत्या मार्गावरून गाडी चालविता?**

आमच्या ठरविलेल्या आठवडी शेड्युलनुसार मला शिफ्ट्स देण्यात येतात. माझ्याकडे चालवयाच्या गाड्यांबाबत दैनंदिन चार्ट असतो. काहीवेळा, वेळेची सक्ती आणि सुट्टी न मिळणे त्रासदायक वाटते. माझी पहिली राईड छत्रपती शिवाजी टर्मिनल्स - बेलापूर दरम्यान होती त्याचे मला खूपच अप्रूप वाटले कारण हा भारतातील सर्वात क्नजेस्टेड रूट आहे. आता शिवाजी टर्मिनल्स - ठाणे किंवा इतर मार्गांवर सुद्धा चालवावे लागते परंतु माझी गाडी चालवण्याची रुची यत्किंचितही कमी झाली नाही.

वैवाहिक जीवनाबद्दल विचारले असता त्या म्हणाल्या नाशिकमधील नंदुरबार येथील इलेक्ट्रिकल इंजिनियर असलेल्या मकसूद काझी यांच्याशी विवाहबद्ध झाल्यानंतर त्यांच्या पाठींब्याने माझा पुढील प्रवास सुरु झाला मला दोन अपत्य असून घर सांभाळून मी माझी नोकरी व्यवस्थित करते तरीही पहाटेच्या शिफ्ट्स किंवा रात्री उशिरापर्यंतच्या शिफ्ट करणे म्हणजे तारेवरची कसरत असते

तुम्हाला वेळेचे नियोजन करता यायला पाहिजे. बाकी व्यवसायांसारखे मोटरमनला विलंब झाल्यास कारणे देता येत नाही. काही सेकंदाचा विलंब मोठ्या प्रमाणावर ट्राफिक जॅमला निमंत्रण देतो. हजारो प्रवाशांचे हाल टाळायचे असतील तर काही सेकंदासाठीचा विलंब टाळणे योग्य.

**तुमच्या या धाडसी प्रवासाबद्दल रेल्वे मंत्रालयातर्फे काही पुरस्कार वैगरे ?**

मुमताज काझी पुढे म्हणाल्या की, डिझेल लोकोमोटिव्ह पहिली महिला वाहनचालक म्हणून १९९५ ला 'किताब मिळाल्यानंतर, गेल्या काही वर्षात अनेक छोट्या - मोठ्या पुरस्काराने गौरविले. वर्ष २०१५ मध्ये मला रेल्वे विभागातर्फे रेल्वे महाव्यवस्थापक पुरस्कार मिळाला.

**असा काही ऑन ड्युटी प्रसंग ज्याने तुम्हाला जीवनाची महती शिकवली ?**

वर्ष २००५ मध्ये मी मुंबई सीएसटीकडे ट्रेन ड्राईव्ह करत होते, मुंब्रा स्थानकानंतर भोगद्याजवळ पोहचत असतांना, अचानक एक महिला कुठून कशी समोर येऊन ट्रॅक वर बसली. मी सतत हॉर्न वाजवून तिला रुळावरून बाजूला होण्यासाठी सांगत होते पण ती हलायला तयार नव्हती. मला लक्षात आले तिला आत्महत्या करायची होती. मी गाडी थांबवून तिच्याजवळ गेले. त्यानंतरचे तीन दिवस मी अन्न पाण्याविना होते, मी मलाच दोष देत होते की या सर्वांसाठी मीच जबाबदार आहे. यानंतर मला माझ्या व्यवसायातील जोखीम आणि जबाबदारीची जाणीव झाली.

**पालकांसाठी संदेश:**

पवित्र ग्रंथ "कुराणामध्ये असे सांगितले आहे की, जर तुम्ही प्रवास करीत असतांना एखादी इच्छा मनाशी बाळगलीत तर ती पूर्ण होते. मी नेहमीच माझ्या प्रवासाची सुरवात अल्लाह जवळ छोट्या प्रार्थनेने करते. मी म्हणते, हे अल्ला माझ्या प्रवासातील सर्व यात्रेकरी त्यांच्या नियोजित स्थळी सुखरूप पोहचण्यासाठी मला मदत कर".

तो मला सतत संरक्षण देत असतो आणि त्याच्याकडून मला प्रत्येक वेळी ऊर्जा प्राप्त होते.

सर्व पालकांनी त्यांच्या पाल्यांच्या इचछेनुसार शिक्षण द्यावे. पालकांचा पाठींब्यामुळे मुलांची जडण घडण योग्य होते त्यांनी पालकांना त्यांच्या मुलांमध्ये चांगले जीवन मूल्य रुजवण्याची विनंती केली जे मुलांच्या भावी आयुष्यासाठी कामी येईल.

जीवनामध्ये कौशल्याची आवश्यकता असते. भरीव काहीतरी करण्यासाठी जीद्द, मेहनत, प्रयत्न यामुळे ठरविलेल्या उद्दिष्टापर्यंत जाण्यास मदत होते. नाहीतर जन्म घेऊन जीवन अंतापर्यंत जगणे खूपच सोपे. देवाने माणसाला मेंदू दिल्याने आणि वाचा दिल्याने तो त्याच्या भावना व्यक्त करू शकतो.

याचा उपयोग  काही रचनात्मक कार्यासाठी केल्यास त्याचे समाधान काही औरच. आज मुमताज यांनी हजारो भारतीय अशा महिलांच्या मनात घर केले आहे, ज्या स्वतःची पात्रता त्यांना आवडणाऱ्या क्षेत्रात आजमावू शकतात. आज संपूर्ण देश  मुमताज काझी यांचे अभिनंदन करण्यासाठी तयार होते जेंव्हा कार्यक्रम समन्वयकाने  काझी यांचे नाव नारी शक्ती पुरस्कार २०१६ साठी  पुकारले. त्यांची विचारांची साखळी तुटली... धड धडणाऱ्या अंतःकरणाने त्या स्टेजवर राष्ट्रपतींच्या हस्ते पुरस्कार स्वीकारण्यासाठी  गेल्यात ... हा  काझींसाठी विशेष दिवस होता ...

त्यांचे अभिनंदन करुन ही मुलाखत इथेच संपवू या!